# केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे

(दि. १७ सप्टेंबर, १८८५-२० नोव्हेंबर, १९७३)

(अल्प परिचय)

"प्रबोधनकार ठाकरे" या नावाने महाराष्ट्राला परिचित असलेले मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते व इतिहासकार. जन्म तत्कालिन कुलाबा जिल्ह्यातील पनवेलचा. त्यांचे शिक्षण पनवेल व देवास येथे मॅट्रीक पर्यंत झाले. तथापि इंग्रजी-मराठी भाषांवर प्रभुत्व संपादन करून त्यांतील उत्तोमोत्तम ग्रंथांचे स्वतंत्रपणे अध्ययनही त्यांनी केले होते. ठाकरे यांचा स्वभाव महत्त्वाकांक्षी आणि हरहुन्नरी होता. त्यांनी काही काळ सरकारी नोकरी केली. टंकलेखन, छायाचित्रकार, तैलचित्रकार, जाहिरातपटू, विमा कंपनीचे प्रचारक, नाटक कंपनीचे चालक असे अनेक उद्योगही केले. तथापि समाजसुधारणेच्या आणि समतेच्या तळमळीतून केलेली झुंजार पत्रकारी, तसेच प्रभावी वक्तृत्व व इतिहास संशोधन ही त्यांच्या कर्तृत्वाची ठळक वैशिष्ट्ये होत.

अस्पृश्यता निवारण, हुंडाविरोध, यांसारख्या सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी आपली वाणी व लेखणी राबविली. "*सारथी*", "*लोकहितवादी*" आणि "*प्रबोधन*" या त्यांनी चालविलेल्या नियतकालिकांची नावेही बोलकी आहेत. त्यांपैकी "*प्रबोधना*"शी त्यांचे नाव कायमचे निगडित राहिले. बहुजन समाजोद्धाराच्या आंदोलनांप्रमाणेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही त्यांनी भाग घेतला. त्यासाठी तुरुंगवास भोगला. अभिनिवेशयुक्त पण अत्यंत सडेतोड, ठाशीव आणि प्रखर विदारक भाषा हे त्यांच्या वाणी-लेखणीचे वैशिष्ट्य होते. "*कुमारिकांचे शाप*" (१९१९), "*भिक्षुकशाहीचे बंड*" (१९२१) ही त्यांची सामाज सुधारणाविषयक उल्लेखनीय पुस्तके. "*विधिनिषेध*" (१९३४) आणि "*टाकलेले पोर*" (१९३९) या त्यांच्या नाटकांतूनही त्यांच्यातील समाजसुधारक प्रकर्षाने व्यक्त झालेला आहे.

मराठ्यांच्या इतिहासाचा त्यांना मोठा अभिमान होता. साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराजांच्या पदच्युतीचा, इंग्रजांनी त्यांच्या केलेल्या अवहेलनेचा आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी थेट लंडनपर्यंत गेलेला त्यांचा निष्ठावंत सेवक रंगो बापूजी यांच्या त्यागाचा साद्यंत इतिहास "*प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापुजी*" (१९४८) हा ग्रंथ लिहून महाराष्ट्रापुढे प्रथम त्यांनी मांडला. "*हिंदवी स्वराज्याचा खून*" (१९२२), "*कोदंडाचा टणत्कार*" (१९२५) आणि "*रायगड*" (१९५१) ही त्यांची इतिहासविषयक पुस्तके. या खेरीज संत रामदास, संत गाडगे महाराज व पंडिता रमाबाई यांची चरित्रेही त्यांनी लिहिली. संत रामदासांचे चरित्र इंग्रजीत लिहिलेले आहे.

"शिवसेना" या राजकीय सामाजिक संघटनेचे नेते आणि "*मार्मिक*" साप्ताहिकाचे संपादक बाळासाहेब ठाकरे हे प्रबोधनकारांचे पुत्र होत. "*मार्मिक*" मधून "*माझी जीवनगाथा*" (१९७३) हे आपले आत्मचरित्र त्यांनी लिहीले.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)